# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.11.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>एनडीए-एक्स्पोऑटम टर्म</u>**

एनडीए एक्स्पो ऑटम टर्म–2025 चं उद्घाटन कुटुंब कल्याण संघटनाच्या अध्यक्षा श्रीमती शालिनी जोगी यांच्या हस्ते आज खळकवासला इथं झालं. एनडीएत दरवर्षी दोनदा आयोजित केला जाणारा हा एक्स्पो, एनडीएच्या पासिंग आऊट परेडपूर्वीच्या आठवड्यात घेतला जातो. विविध सहशालेय उपक्रमांचा हा परिपाक असून, या एक्स्पोत 11 इनडोअर आणि 14 आउटडोअर हौशी क्लबचं आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आलं आहे. क्लब उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उमेदवारांना जोगी यांच्या हस्ते पुस्तक पारितोषिके आणि प्रावीण्य प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आलं.

**<u>निवडणुक</u>**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या प्रारूप मतदारयादीतील चुका तातडीनं दुरुस्त करण्याचा आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिला आहे. अनेक मतदार चुकीच्या प्रभागात समाविष्ट झाल्याची तक्रार होत आहे. यामुळं राज्य निवडणूक आयोगानंही स्वतःहून चुका दुरुस्त करण्याचा निर्देश दिला आहे. आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकीत मतदार योग्य प्रभागात समाविष्ट झाले आहेत का, याची काटेकोर तपासणी करण्यास सांगण्यात आलं. निवडणुकीत अल्प मतांवर निकाल ठरतो, यामुळं मतदारयादी बिनचूक ठेवण्यावर प्रशासनाचा भर असल्याचं राम यांनी स्पष्ट केलं.

**साखरउत्पादन**

यंदाच्या ऊस गाळप हंगामात 350 लाख मेट्रिक टन इतकं नवीन साखर उत्पादन होण्याचा अंदाज आहे. साखरेचा आरंभीचा शिलकी साठा 50 लाख मेट्रिक टन असून देशांतर्गत साखरेचा खप 290 लाख मेट्रिक टन आहे. तर 35 लाख मेट्रिक टन साखर इथेनॉल तयार करण्यासाठी वापरली जाईल. तरीसुद्धा 75 लाख मेट्रिक टन साखर शिल्लक राहण्याचा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाकडून वर्तविण्यात आला आहे. राज्यांतर्गत उत्पादनात यंदा महाराष्ट्रात 125 लाख मेट्रिक टन, उत्तर प्रदेशात 110 लाख मेट्रिक टन आणि कर्नाटकात 70 लाख मेट्रिक टन इतकं सर्वाधिक उत्पादन अपेक्षित आहे.

**मेट्रो**

केंद्र सरकारने मंजूरकेलेल्या खराडी-खडकवासला आणि नळस्टॉप ते माणिकबाग दरम्यानच्या मेट्रो मार्गांचेकाम सहा महिन्यांत सुरू होणार आहे. मंजुरी दिलेल्या मार्गांबाबतचे अधिकृतपत्रमहामेट्रोला मिळाल्यानंतर महामेट्रोबरोबर केंद्र सरकारच्या संबंधित विभागांचा करारहोईल. तो झाल्यावर मेट्रोकडून दोन्ही मार्गांसाठी निविदा जाहीर केल्या जातील.दरम्यानच्या काळात नवीन २८ स्थानकांसाठी महामेट्रोकडून आराखडा तयार करण्याचीप्रक्रिया सुरू झाली आहे. या दोन मार्गांना मंजुरी मिळाल्याने शहरातील मेट्रोचेजाळे ११० किलोमीटरपर्यंत विस्तारले जाणार आहे. खराडी, हडपसर, स्वारगेट आणिखडकवासला या साडेपंचवीस आणि नळस्टॉप, वारजे आणि माणिकबाग या ६ पूर्णांक १२ किलोमीटरच्या मार्गांना केंद्र सरकारनेमंजुरी दिल्यामुळे शहरातील मेट्रोचे जाळे विस्तारणार आहे.

**स्थास्वसं**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगाने जिथे ५० टक्केपेक्षा आरक्षण आहे अशा जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका वेळेत पार पडतील, असे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त देण्यात आल्याने याबाबत न्यायालयात सुनावणी सुरू असून न्यायालयीन प्रक्रियेच्या निर्णयाबाबत उद्या समजेलच पण ज्या

ठिकाणी ५० टक्के पेक्षा अधिक आरक्षण पोहोचले आहे. त्या ठिकाणच्या निवडणुकीसंदर्भात प्रश्नचिन्ह उभे राहू शकतात. तर महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ असून ३ लाखापेक्षा जास्त दुबार मतदार आहेत. त्यावरून सर्वपक्षीय राजकीय पदाधिकाऱ्यांनी आयोगाकडे तक्रारी केल्या आहेत.

**भूजल**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत केंद्राकडून मिळणारे पूरक 25 टक्के प्रोत्साहन अनुदान 30 सप्टेंबर 2025 पासून अचानक बंद करण्यात आल्याने या योजनेतील शेतकरी सहभागाचीसंख्या घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या अभियानांतर्गत अनुदान मिळत असल्याने शेतकऱ्यांचाउत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. मात्र अनुदान बंद झाल्याने परिपूर्ण प्रस्तावनापूर्वसंमती ही 50 टक्के अनुदानावर देण्यात येत असल्याचं पुणे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाचे प्रकल्प संचालक अशोक किरनळ्ळी यांनी म्हटलंआहे.

**अटक**

दहशत माजविण्यासाठी वाहनांची तोडफोड करणाऱ्या गुंडाला येरवडा पोलिसांनी अटक केली. समीर शब्बीर शेख असे अटक करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे. शेख हा सराईत गुंड असून, 'मकोका' कारवाईत न्यायालायने त्याला जामीन मंजूर केला होता. जामीन मंजूर झाल्यानंतर तो पुन्हा येरवडा भागात आला. त्याच्याविरुद्ध यापूर्वी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अर्थात मकोका , तसच एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. दहशत माजविणे, तसेच एकाबरोबर झालेल्या भांडणातून वाहनांची तोडफोड केल्याची कबुली त्याने दिली.

**अग्निशमनविभाग**

देहू रोड कँटॉन्मेंट बोर्ड इथल्या संरक्षण दलाच्या जवानांनी पिंपरी चिंचवड महापालिकेतील मुख्य अग्निशमन केंद्राला नुकतीच भेट दिली. ही भेट देण्यामागे अग्निशमन विभागाचं कामकाज जाणून घेणं, अग्निशमन विभागाच्या गाड्या तसंच इतर संसाधनांची माहिती घेणं आणि अग्निशमन विभागाच्या जवानांसोबत सराव करणं हा मुख्य उद्देश होता.

**<u>संविधानदिन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं काल आणि आज भारतीय संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पिंपरी इथल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मैदानाजवळ भीमसृष्टी उभारण्यात आली असून या ठिकाणी विविध कार्यक्रम होत आहेत. आज सकाळी संविधानावर आधारित चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. तर आज संध्याकाळी ख्यातनाम गायक चंद्रकांत शिंदे यांचा जागर संविधान गायनाचा कार्यक्रम होणार आहे.

**<u>होर्डिंग्जपरवानगी</u>**

पुणे शहरातील होर्डिंग्ज परवानगी शुल्क वाढीचा पुणे महापालिकेचा ठराव राज्याच्या नगरविकास विभागानं रद्द केला आहे. मे 2022 मध्ये तयार केलेल्या नियमावलीशी ही दरवाढ सुसंगत नसल्याचं कारण देत राज्य सरकारनं हा निर्णय घेतला आहे. न्यायालयाच्या सूचनेनुसार पुणे महापालिका सध्या 111 रुपये प्रति चौ. फुट दरानं शुल्क आकारत होती. मात्र प्रस्तावित दरवाढ 576 रुपये प्रति चौ.फुटांपर्यंत जाणार होती. राज्याच्या हस्तक्षेपामुळं ही वाढ थांबली आहे.

**<u>ससूनच्कर्करोगरुग्णालय</u>**

ससून रुग्णालयाच्या परिसरात उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित कर्करोग रुग्णालयाच्या २५ खाटा या एका खासगी कंपनीकडं चालवायला देण्यात येणार आहे. यामुळं खासगी कंपन्यांना सरकारी रुग्णालयांकडून

नफा कमवायचा आहे. हे खासगीकरण पाहून रुग्ण, आरोग्य कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांकडून तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान १४ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही किमान तापमान साधारण असंच असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**